# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./ १४७७ /२०१९ दि. २२/०५/२०१९

## परिपत्रक

**विषय: - महाविद्यालयाव्दारे दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या सोयी व सवलतीची माहिती तात्काळ सादर करण्याबाबत.**

संदर्भ:- १) मा. वरिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र युएनआय-२०१८ /दिविसो /(१९५ /१८)/विशि/५८१९ दिनांक ०९/०४/२०१९

२) परिपत्रक क्र. गों.वि./आस्था/११९१/२०१९ दिनांक २३/०४/२०१९

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक, व सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, दिव्यांगाना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व महाविद्यालयांना परीपत्रकाव्दारे कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने महाविद्यालयाव्दारे दिव्यांगाना कोणकोणत्या सोयी व सवलती उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहे. त्या संबंधीत संपूर्ण माहिती सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी मध्ये सोबत संलग्नित प्रपत्रामध्ये भरून gondwanaesst@gmail.com या ईमेल वर ७ दिवसाच्या आत सादर करण्याबाबत संदर्भिय परिपत्रक क्र. २ नुसार सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले होते.

परंतु अद्यापपर्यंत बऱ्याच महाविद्यालयांनी दिव्यांगाना देण्यात येणाऱ्या सोयी व सवलतीची माहिती सादर केलेली नाही. सदर माहिती शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांना सादर करावयाची असून त्याअनुषंगाने तात्काळ कार्यवाही घेवुन सोबत संलग्नित प्रपत्रामध्ये माहिती सादर करावी.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र:- प्रपत्र

**प्रतिलिपी माहितीस्तव अग्रेषित:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीस्तव.

# प्रपत्र

## महाविद्यालयाव्दारे दिव्यांगाना देण्यात येणाऱ्या सोयी व सवलती ची माहिती

**महाविद्यालयाचे नाव:-** ----------------------------------------------------------

| अ. क. | तपशिल | महाविद्यालयाव्दारे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयामध्ये किती इमारती आहे? | |
| २ | महाविद्यालयामध्ये किती इमारतीला रॅम्प/लिफ्ट आहे? | |
| ३ | महाविद्यालयामध्ये दिव्यांगासाठी किती स्वतंत्र शौचालये उपलब्ध आहे? | |
| ४ | महाविद्यालयाव्दारे दिव्यांगासाठी स्वतंत्र वेबसाईट तयार केली आहे काय? | |
| ५ | दिव्यांगासाठी विविध सॉफ्टवेअर तयार केले आहे काय? केले नसल्यास कधीपर्यंत तयार करण्यात येईल याची माहिती दयावी. | |
| ६ | दिव्यांगासाठी सुगम्य ग्रंथालय निर्मीती केली आहे काय? | |
| ७ | शिक्षण/अभ्यासक्रम आकलनासाठी सुलभ पध्दती विकसित करणे संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. | |
| ८ | प्रवेशासाठी आरक्षण उपलब्ध करून देण्यासंदर्भात घेतलेल्या कार्यवाहीचा अहवाल. | |
| ९ | दिव्यांगासाठी राबविलेले उपक्रमाची माहिती. | |
| १० | समान संधी कक्ष (सेल) स्थापना केली आहे काय? | |
| ११ | इमारत बांधकाम करताना कलम ४४ नुसार सुविधा निर्माण करणे. | |
| १२ | महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती देणे. | |
| १३ | महाविद्यालयामध्ये दिव्यांग कर्मचारी व विद्यार्थी किती आहे? | |
| १४ | शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी केलेल्या व्यवस्थेची माहिती. | |
| १५ | महाविद्यालयाव्दारे दिव्यांगाना पुरविण्यात येणाऱ्या इतर सोयी व सुविधांची माहिती. | |

वरील मुद्दयांची माहिती सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी मध्ये gondwanaesst@gmail.com या ईमेल वर विनाविलंब पाठवावी.

*टीप:- उक्त माहिती विस्तृत स्वरूपाची असल्यास सोबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.